भारत सरकार
विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# मोटार परिवहन कामगार अधिनियम, १९६१

( १९६१ चा अधिनियम क्रमांक २७ )

[ १ नोव्हेंबर, १९७७ रोजी अंमलात असल्याप्रमाणे ]

# The Motor Transport Workers Act, 1961

(Act No. 27 of 1961)

[*As in force on 1st November, 1977*]

संचालक, मुद्रण व लेखन सामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
(१९७८)

किंमत ६० पैसे

# मोटार परिवहन कामगार अधिनियम, १९६१
## (१९६१ चा अधिनियम क्रमांक २७)

### कलमांचा क्रम

### प्रकरण १ ले

### प्रारंभिक

कलमे


१. संक्षिप्त नाव, विस्तार, प्रारंभ व प्रयुक्ती.
२. व्याख्या.


### प्रकरण २ रे

### मोटार परिवहन उपक्रमांची नोंदणी


३. मोटार परिवहन उपक्रमाची नोंदणी.


### प्रकरण ३ रे

### निरीक्षण करणारा कर्मचारीवर्ग


४. मुख्य निरीक्षक आणि निरीक्षक.
५. निरीक्षकांच्या शक्ती.
६. निरीक्षकांना उपलब्ध करून द्यावयाच्या सुविधा.
७. प्रमाणन शल्यचिकित्सक.


### प्रकरण ४ थे

### कल्याण व आरोग्य


८. आहारगृहे.
९. विश्रांतिकक्ष.
१०. गणवेष.
११. वैद्यकीय सुविधा.
१२. प्रथमोपचार सुविधा.


### प्रकरण ५ वे

### कामधंद्याचे तास व मर्यादा


१३. प्रौढ मोटार परिवहन कामगारांचे कामाचे तास.
१४. मोटार परिवहन कामगार म्हणून कामाला लावलेल्या किशोरवयीन व्यक्तींचे कामाचे तास.
१५. दैनंदिन विश्रांतीची मध्यंतरे.
१६. कार्यकालविस्तार.
१७. विभागलेली कामाची पाळी.
१८. कामाच्या अवधीबाबतची नोटीस.
१९. साप्ताहिक विश्रांती.
२०. भरपाईचा विश्रांति-दिवस.


### प्रकरण ६ वे

### अल्पवयीन व्यक्तींना कामावर ठेवणे


२१. बालकांना कामावर ठेवण्यास मनाई.
२२. मोटार परिवहन कामगार म्हणून कामाला लावलेल्या किशोरवयीन व्यक्तींनी टोकने बाळगणे.
२३. पात्रता-प्रमाणपत्र.
२४. वैद्यकीय तपासणी आवश्यक करण्याची शक्ती.


### प्रकरण ७ वे

### वेतन व रजा


२५. मोटार परिवहन कामगारांना वेतन देण्याबाबत १९३६ चा अधिनियम ४ लागू असणे.
२६. अतिकालिक कामाबद्दल जादा वेतन.
२७. वार्षिक सवेतन रजा.
२८. रजेच्या कालावधीमधील वेतन.

प्रकरण ८ वे.

दंड व प्रक्रिया

२९. अटकाव.
३०. खोटया पात्रता-प्रमाणपत्राचा वापर.
३१. मोटार परिवहन कामगारांना कामावर ठेवण्याच्या संबंधातील उपबंधांचे व्यतिक्रमण.
३२. अन्य गुन्हे.
३३. पूर्वीच्या दोषसिद्धीनंतर वाढीव दंड.
३४. कंपन्यांनी केलेले गुन्हे.
३५. गुन्ह्यांची दखल घेणे.
३६. खटल्यांची मुदत.

प्रकरण ९ वे

संकीर्ण

३७. या अधिनियमाशी विसंगत असलेले कायदे व करार यांची परिणामकता.
३८. सूट.
३९. निदेश देण्याची शक्ती.
४०. नियम करण्याची शक्ती.

---

# मोटार परिवहन कामगार अधिनियम १९६१

(१९६१ चा अधिनियम क्रमांक २७)

[२० मे, १९६१]

मोटार परिवहन कामगारांच्या कल्याणाचा उपबंध करण्यासाठी आणि त्यांच्या कामाची परिस्थिती नियमित करण्यासाठी अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या बाराव्या वर्षी पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो:—

## प्रकरण १ लें

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव, विस्तार, प्रारंभ व प्रयुक्ती.

१. (१) या अधिनियमाला 'मोटार परिवहन कामगार अधिनियम, १९६१' असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार[1] * * * संपूर्ण भारतभर आहे.

(३) केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील त्या, पण ३१ मार्च, १९६२ नंतरच्या नसलेल्या अशा दिनांकी तो अंमलात येईल आणि निरनिराळ्या राज्यांसाठी निरनिराळे दिनांक[2] नियत करता येतील:

---

१. 'केंद्रीय कामगार कायदे (जम्मू आणि काश्मीरवर विस्तारण) अधिनियम, १९७०' (१९७० चा ५१)-कलम २ व अनुसूची यांद्वारे "जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकडून" हे शब्द वगळण्यात आले (१ सप्टेंबर, १९७१ रोजी व तेव्हापासून).

२. हा अधिनियम खालीलप्रमाणे अंमलात आणला:—

| राज्य/राज्यक्षेत्र | दिनांक | अधिसूचना |
|---|---|---|
| मध्यप्रदेश | २६ जानेवारी, १९६२ | |
| आसाम | | |
| केरळ | | |
| म्हैसूर | | |
| ओरिसा | | |
| पंजाब | १ फेब्रुवारी, १९६२ | स्थायी आदेश २९६, दिनांक २३ जानेवारी, १९६२, **भारताचे राजपत्र**, भाग दोन, विभाग ३ (दोन), असाधारण, पृष्ठ १६७. |
| अंदमान व निकोबार बेटे | | |
| दिल्ली | | |
| हिमाचल प्रदेश | | |
| पश्चिम बंगाल | १ मार्च, १९६२ | |
| तामिळनाडु | | |
| महाराष्ट्र | ३१ मार्च, १९६२ | |
| उत्तर प्रदेश | | |
| आंध्र प्रदेश | १ फेब्रुवारी, १९६२ | स्थायी आदेश ३१०, दिनांक ३ जानेवारी, १९६२, कित्ता, असाधारण, पृष्ठ १८९. |
| राजस्थान | १ फेब्रुवारी, १९६२ | स्थायी आदेश ३८२, दिनांक ३१ जानेवारी, १९६२, कित्ता, असाधारण, पृष्ठ ९७. |
| त्रिपुरा | १५ फेब्रुवारी, १९६२ | स्थायी आदेश ४६८, दिनांक ९ फेब्रुवारी, १९६२, कित्ता, पृष्ठ ३९९. |
| बिहार | १ मार्च, १९६२ | स्थायी आदेश ५७३, दिनांक १६ फेब्रुवारी, १९६२, कित्ता, पृष्ठ ५३०. |
| गुजरात | ३१ मार्च, १९६२ | स्थायी आदेश ७८१, दिनांक ९ मार्च, १९६२, कित्ता, पृष्ठ ७०३. |
| मणिपूर | | |
| दादरा व नगरहवेली | १ जुलै, १९६५ | १९६३ चा विनियम ६, कलम २ व अनुसूची १ली. |
| पाँडिचेरी | १ ऑक्टोबर, १९६३ | १९६३ चा विनियम ७, कलम ३ व अनुसूची १ली. |
| गोवा, दमण व दीव | १९ डिसेंबर, १९६३ | १९६३ चा विनियम ११, कलम ३ व अनुसूची. |

[1] [परंतु, 'केंद्रीय कामगार कायदे (जम्मू आणि काश्मीरवर विस्तारण) अधिनियम १९७०' (१९७० चा ५१) याच्या प्रारंभापासून तो जम्मू व काश्मीर राज्यामध्ये अंमलात येईल.

(४) पाच किंवा अधिक मोटार परिवहन कामगारांना कामावर ठेवणाऱ्या प्रत्येक मोटार परिवहन उपक्रमाला तो लागू आहे:

परंतु, पाचाहून कमी मोटार परिवहन कामगारांना कामावर ठेवणाऱ्या कोणत्याही मोटार परिवहन उपक्रमाला या अधिनियमातील सर्व किंवा कोणतेही उपबंध लागू करावयाचे झाल्यास **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे राज्य शासन तसे करण्याचा आपला उद्देश असल्याबद्दल किमान दोन महिन्यांची नोटीस देऊन नंतर ते तसे लागू करू शकेल.

व्याख्या.

२. या अधिनियमामध्ये संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,——

(क) "किशोर" याचा अर्थ, ज्या व्यक्तीच्या वयाला पंधरा वर्षे पूर्ण झालेली आहेत पण अठरा वर्षे पूर्ण झालेली नाहीत ती व्यक्ती असा आहे;

(ख) "प्रौढ" याचा अर्थ, ज्या व्यक्तीच्या वयाला अठरा वर्षे पूर्ण झालेली आहेत ती व्यक्ती असा आहे ;

(ग) "बालक" याचा अर्थ, ज्या व्यक्तीच्या वयाला पंधरा वर्षे पूर्ण झालेली नाहीत ती व्यक्ती असा आहे ;

(घ) "दिवस" याचा अर्थ, मध्यरात्रीपासून सुरू होणारा चोवीस तासांचा कालावधी असा आहे :

परंतु, ज्याबाबतीत एखाद्या मोटार परिवहन कामगाराची कामाची पाळी मध्यरात्रीपूर्वी सुरू होते परंतु मध्यरात्रीनंतरही चालू राहते त्याबाबतीत, त्याच्यापुरता पुढचा दिवस म्हणजे अशी कामाची पाळी संपल्यापासून सुरू होणारा चोवीस तासांचा कालावधी होय असे मानण्यात येईल, आणि मध्यरात्रीनंतर त्याने जितके तास काम केले ते तास आधीच्या दिवसामध्ये धरले जातील ;

(ङ) "नियोक्ता" याचा कोणत्याही मोटार परिवहन उपक्रमाच्या संबंधातील अर्थ, ज्या व्यक्तीचे किंवा प्राधिकरणाचे मोटार परिवहन उपक्रमाच्या कारभारावर अंतिम नियंत्रण असेल ती व्यक्ती किंवा ते प्राधिकरण आणि जेव्हा उक्त कारभार अन्य एखाद्या व्यक्तीकडे सोपवलेला असेल——मग त्या व्यक्तीला व्यवस्थापक, व्यवस्थापन संचालक, व्यवस्थापन एजंट म्हणून किंवा दुसऱ्या एखाद्या नावाने संबोधण्यात येवो——तेव्हा अशी अन्य व्यक्ती असा आहे;

(च) "कामाचे तास" याचा अर्थ, ज्या अवधीत मोटार परिवहन कामगार हा, नियोक्त्याचा किंवा त्याच्याकडून काम करून घेण्यास हक्कदार असलेल्या अन्य एखाद्या व्यक्तीचा ताबेदार असतो तो अवधी असा आहे आणि त्यामध्ये——

(एक) परिवाहन धावत असताना केलेल्या कामामध्ये घालवलेला वेळ ;

(दोन) दुय्यम कामामध्ये घालवलेला वेळ; आणि

(तीन) अंतिम ठिकाणी ज्या ज्या वेळी तो पंधरा मिनिटांहून कमी काळ हजर राहिला असेल असे त्याच्या निव्वळ हजेरीचे अवधी,

यांचा समावेश आहे.

**स्पष्टीकरण.**——या खंडाच्या प्रयोजनार्थ,——

(१) "धावण्याचा वेळ" याचा कामाच्या दिवसासंबंधातील अर्थ, कामाच्या दिवसाच्या सुरुवातीला ज्या क्षणी परिवाहन धावण्यास सुरुवात होते तेव्हापासून कामाचा दिवस सरतेवेळी जेव्हा परिवाहन धावण्याचे थांबते त्या क्षणापर्यंतच्या वेळापैकी ते परिवाहन चालवणाऱ्या किंवा परिवाहनाबाबतचे इतर कोणतेही काम करणाऱ्या व्यक्ती ज्या अवधीत त्यांच्या मर्जीप्रमाणे वेळ घालवण्यास मोकळ्या असतात किंवा दुय्यम कामात गुंतलेल्या असतात असा जितका अवधी विहित करण्यात येईल त्याहून जितका अधिक वेळ परिवाहनाच्या धावण्याच्या क्रियेत खंड पडेल तितका वेळ वगळून राहणारा वेळ असा आहे;

---

१. १९७० चा अधिनियम ५१-कलम २ व अनुसूची यांद्वारे जादा दाखल केले (१ सप्टेंबर, १९७१ रोजी व तेव्हापासून).

(२) "दुय्यम काम" याचा अर्थ, परिवाहन, त्यातील उतारू किंवा त्यावरील बोजा याच्या संबंधातील जे काम परिवाहन धावण्याच्या वेळाबाहेर केले जाते ते काम असा असून, त्यामध्ये विशेषतः पुढील कामांचा समावेश होतो :—

(एक) हिशेबाबाबतचे काम, रोकड भरणे, नोंदवह्यांमध्ये सह्या करणे, सेवापत्रके हाती सोपवणे, तिकिटे तपासणे आणि अन्य तत्सम कामे ;

(दोन) परिवाहन ताब्यात घेणे व मोटारघरात ठेवणे ;

(तीन) एखादी व्यक्ती ज्या ठिकाणी कामावर हजर झाल्याची सही करते तेथून जेथे ती परिवाहन ताब्यात घेते त्या जागेपर्यंत आणि जेथे ती परिवाहन सोडून देते तेथून जेथे ती काम संपवून जाण्याची सही करते त्या जागेपर्यंत प्रवास करणे ;

(चार) परिवाहनाची देखभाल आणि दुरुस्ती यासंबंधीचे काम ; आणि

(पाच) परिवाहनावर बोजा चढवणे आणि त्यावरून बोजा उतरवणे ;

(३) "निव्वळ हजेरीचा अवधी" याचा अर्थ, जेव्हा एखादी व्यक्ती वेळीप्रसंगी पडेल ती गरज निभावण्यासाठी किंवा कामाच्या वेळापत्रकात ठरवून दिलेल्या वेळी काम सुरू करण्यासाठी नियत जागी हजर राहते तो काळ असा आहे ;

(छ) "मोटार परिवहन उपक्रम" याचा अर्थ, भाडे किंवा मोबदला यांच्या बदल्यात सडकेवरून उतारूंची किंवा मालाची किंवा दोन्हींची ने-आण करणारा मोटार परिवहन उपक्रम असा आहे, आणि त्यात निजी वाहकाचाही समावेश आहे;

(ज) "मोटार परिवहन कामगार" याचा अर्थ, जी व्यक्ती एखाद्या परिवाहनावर पेशावारी काम करण्यासाठी किंवा अशा परिवाहनाचे आगमन, प्रयाण, त्यावर बोजा चढवणे किंवा त्यावरून बोजा उतरवणे याच्यासंबंधीची कामे बजावण्यासाठी एखाद्या मोटार परिवहन उपक्रमामध्ये प्रत्यक्षपणे किंवा एखाद्या यंत्रणेमार्फत नेमण्यात आलेली असेल ती व्यक्ती असा आहे आणि त्यात, चालक, वाहक, क्लीनर, स्थानक कर्मचारीवर्ग, मार्गतपासणी करणारा कर्मचारीवर्ग, तिकिट बाबू, रोख लिपिक, डेपो लिपिक, समयलेखक, पहारेकरी किंवा परिचर यांचा समावेश आहे, परंतु कलम ८ सोडून अन्यत्र त्यामध्ये पुढील व्यक्तींचा समावेश होत नाही :—

(एक) उपरोक्त अशी जी कोणतीही व्यक्ती 'कारखाना अधिनियम, १९४८' (१९४८ चा ६३) यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेल्या कारखान्यात कामाला असेल ती व्यक्ती ;

(दोन) उपरोक्त अशा ज्या कोणत्याही व्यक्तीला दुकाने किंवा व्यापारी आस्थापना यांमध्ये कामाला असलेल्या व्यक्तींच्या सेवा-शर्तींचे विनियमन करणाऱ्या, त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याचे उपबंध लागू आहेत ती व्यक्ती ;

(झ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे;

(ञ) "अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायी" याचा अर्थ, 'भारतीय वैद्यक पदवी अधिनियम, १९१६' (१९१६ चा ७) याच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या किंवा त्या अधिनियमाच्या कलम ३ खाली अधिसूचित केलेल्या किंवा 'भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम, १९५६' (१९५६ चा १०२) याच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा प्राधिकरणाकडून प्रमाणपत्र मिळालेली व्यक्ती असा आहे, आणि कोणत्याही प्रांतीय किंवा राज्य वैद्यकीय परिषद अधिनियमाखाली प्रमाणपत्र मिळालेल्या कोणत्याही व्यक्तीचा त्यात समावेश आहे ;

(ट) "कार्यकालविस्तार" याचा अर्थ, कोणत्याही दिवशी कामाची पाळी सुरू झाल्यापासून त्या दिवसाची कामाची पाळी संपेपर्यंतचा अवधी असा आहे;

(ठ) "वेतन" याला 'वेतन प्रदान अधिनियम, १९३६' (१९३६ चा ४) याच्या कलम २ च्या खंड (सहा) मध्ये नेमून दिल्याप्रमाणे अर्थ आहे ;

(ड) "आठवडा" याचा अर्थ, शनिवारी मध्यरात्रीपासून ते नंतरच्या शनिवारच्या मध्यरात्रीपर्यंतचा कालावधी असा आहे ;

(ढ) या अधिनियमात वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न केलेले आणि 'मोटार वाहन अधिनियम, १९३९' (१९३९ चा ४) यामध्ये व्याख्या केलेले इतर सर्व शब्द आणि शब्दप्रयोग यांना त्या अधिनियमात नेमून दिल्याप्रमाणे ते ते अर्थ असतील.

प्रसिद्धी दोन–अ एच ४८२४–२ (१,०५५–६–७९)

## प्रकरण २ रे

### मोटार परिवहन उपक्रमांची नोंदणी

मोटार परिवहन उपक्रमाची नोंदणी.

३. (१) ज्याला हा अधिनियम लागू आहे अशा मोटार परिवहन उपक्रमाचा प्रत्येक नियोक्ता या अधिनियमाखाली उपक्रमाची नोंदणी करवून घेईल.

(२) मोटार परिवहन उपक्रमाच्या नोंदणीसाठी नियोक्ता, विहित असेल अशा नमुन्यात आणि अशा कालावधीत विहित प्राधिकरणाकडे अर्ज करील.

(३) जेव्हा या अधिनियमाखाली मोटार परिवहन उपक्रमाची नोंदणी करण्यात येईल तेव्हा, विहित करण्यात येईल असा तपशील अंतर्भूत असलेले नोंदणी प्रमाणपत्र नियोक्त्याला देण्यात येईल.

## प्रकरण ३ रे

### निरीक्षण करणारा कर्मचारीवर्ग

मुख्य निरीक्षक आणि निरीक्षक.

४. (१) राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे राज्याकरता यथार्ह व्यक्तीला मुख्य निरीक्षक म्हणून आणि आपणांस योग्य वाटतील इतक्या यथार्ह व्यक्तींना मुख्य निरीक्षकाच्या हाता-खालील निरीक्षक म्हणून नियुक्त करू शकेल.

(२) निरीक्षकांना या अधिनियमाखालील आपल्या शक्ती कोणत्या स्थानिक सीमांमध्ये वापराव्या लागतील हे मुख्य निरीक्षक जाहीर करील, आणि राज्य शासन त्याच्याकडे नेमून देईल अशा स्थानिक सीमांमध्ये तो स्वत: निरीक्षकाच्या शक्ती वापरू शकेल.

(३) मुख्य निरीक्षक आणि सर्व निरीक्षक हे 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५)-कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

निरीक्षकांच्या शक्ती.

५. (१) राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे ज्या शर्ती आणि निर्बंध घालील त्यांच्या अधीनतेने मुख्य निरीक्षक किंवा निरीक्षक,––

(क) कोणत्याही मोटार परिवहन उपक्रमाच्या बाबतीत या अधिनियमाचे उपबंध किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम पाळले जातात किंवा नाहीत याची खात्री करून घेण्यासाठी त्याला योग्य वाटेल अशी तपासणी किंवा चौकशी करू शकेल, आणि त्या प्रयोजनासाठी वाजवी रीत्या आवश्यक असेल इतका वेळ ते परिवाहन थांबवून वाजवी रीत्या आवश्यक असेल इतका वेळ ते उभे करून ठेवण्यास चालकाला फर्मावू शकेल ;

(ख) जी कोणतीही वास्तू एखाद्या मोटार परिवहन उपक्रमाच्या वापरात किंवा ताब्यात आहे असे मानण्यास त्याला कारण असेल अशा कोणत्याही वास्तूमध्ये, या अधिनियमाची उद्दिष्टे पार पाडण्यासाठी त्याला योग्य वाटेल असे काही सहाय्य उपलब्ध असल्यास त्यानिशी प्रवेश करू शकेल, निरीक्षण करू शकेल व झडती घेऊ शकेल ;

(ग) मोटार परिवहन उपक्रमामध्ये काम करणाऱ्या कोणत्याही मोटार परिवहन कामगाराची तपासणी करू शकेल किंवा या अधिनियमानुसार ठेवलेली कोणतीही नोंदवही किंवा अन्य दस्तऐवज सादर करण्यास फर्मावू शकेल, आणि या अधिनियमाची उद्दिष्टे पार पाडण्यासाठी त्याला आवश्यक वाटेल त्याप्रमाणे कोणत्याही व्यक्तीच्या तिथल्या तिथेच किंवा अन्यथा जबान्या घेऊ शकेल ;

(घ) या अधिनियमाखालील जो गुन्हा नियोक्त्यांने केलेला आहे असे समजण्यास स्वत:ला कारण असेल त्याबाबतीत त्याला संबद्ध वाटतील अशा नोंदवह्या किंवा दस्तऐवज किंवा त्यांचे काही भाग सक्तीने ताब्यात घेऊ शकेल किंवा त्यांच्या नकला घेऊ शकेल ;

(ङ) विहित करण्यात येतील अशा अन्य शक्ती वापरू शकेल :

परंतु, कोणत्याही व्यक्तीला, ज्या प्रश्नाचा किंवा जबानीचा रोख तिला गुन्ह्यामध्ये गोवण्याकडे असेल अशा कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देण्यास किंवा अशी कोणतीही जबानी देण्यास या पोट-कलमाखाली सक्ती केली जाणार नाही.

(२) 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८' (१८९८ चा ५) याचे उपबंध उक्त संहितेच्या कलम ९८ खाली काढलेल्या वॉरंटाच्या प्राधिकारान्वये घेतलेल्या कोणत्याही झडतीस किंवा केलेल्या अभिग्रहणास ज्याप्रमाणे लागू होतात त्याप्रमाणे ते, होईल तेथवर, या कलमाखालील कोणत्याही झडतीस किंवा अभिग्रहणास लागू होतील.

६. प्रत्यक नियोक्ता मुख्य निरीक्षकाला व निरीक्षकांना या अधिनियमाखाली केव्हाही प्रवेश करण्यासाठी, निरीक्षण करण्यासाठी, तपासणी करण्यासाठी किंवा चौकशी करण्यासाठी लागणा-या सर्व वाजवी सुविधा उपलब्ध करून देईल. निरीक्षकांना उपलब्ध करून द्यावयाच्या सुविधा.

७. (१) राज्य शासन या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायींना, त्यांच्यापैकी प्रत्येकाला ते नेमून देईल अशा स्थानिक सीमांमध्ये किंवा अशा मोटार परिवहन उपक्रमांसाठी किंवा अशा वर्गातील मोटार परिवहन उपक्रमांसाठी प्रमाणन शल्यचिकित्सक म्हणून नियुक्त करू शकेल. प्रमाणन शल्य-चिकित्सक.

(२) प्रमाणन शल्यचिकित्सक पुढील बाबतीत विहित केली असतील अशी कामे पार पाडील :—

(क्) मोटार परिवहन कामगारांची तपासणी करणे व प्रमाणन करणे;

(ख्) कोणत्याही मोटार परिवहन उपक्रमामध्ये एखाद्या कामावर मोटार परिवहन कामगार म्हणून किशोरवयीन व्यक्तींना ठेवलेले असून किंवा ठेवावयाचे असून ते त्यांच्या आरोग्याला अपायकारक ठरण्याचा संभव असेल तेथे, विहित केली जाईल त्याप्रमाणे वैद्यकीय देखरेख ठेवणे.

## प्रकरण ४ थे

## कल्याण व आरोग्य

८. (१) मोटार परिवहन उपक्रमामध्ये कामाला ठेवलेल्या शंभर किंवा त्याहून अधिक मोटार परिवहन कामगारांना सर्वसाधारणपणे जेथे प्रत्येक दिवशी कामावर यावे लागते त्या प्रत्येक ठिकाणी मोटार परिवहन कामगारांच्या सोयीसाठी नियोक्त्याने एका किंवा अधिक आहारगृहांची व्यवस्था करून ती आहारगृहे चालवली पाहिजेत असे आवश्यक करणारे नियम राज्य शासनाला करता येतील. आहारगृहे.

(२) पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांद्वारे पुढील बाबींसाठी उपबंध करता येतील :—

(क्) कोणत्या दिनांकापर्यंत आहारगृहांची व्यवस्था करण्यात यावी;

(ख्) किती आहारगृहांची व्यवस्था करावी आणि आहारगृहांचे बांधकाम, जागा, साजसामान व अन्य साधनसामग्री यांबाबतची मानके कोणती असावीत;

(ग्) तेथे कोणते खाद्यपदार्थ ठेवता येतील आणि त्यांसाठी कोणते दर ठेवता येतील;

(घ्) आहारगृहाकरता व्यवस्थापन समितीची स्थापना व आहारगृहाच्या व्यवस्थापकवर्गामध्ये मोटार परिवहन कामगारांचे प्रतिनिधित्व.

(३) राज्य शासन, ते ज्या शर्ती घालील त्यांच्या अधीनतेने, पोटकलम (२) च्या खंड (ग्) ला अनुलक्षून नियम करण्याची शक्ती निरीक्षकाकडे प्रत्यायोजित करू शकेल.

९. (१) मोटार परिवहन उपक्रमामध्ये कामाला ठेवलेल्या मोटार परिवहन कामगारांना रात्री जेथे मुक्काम करावा लागतो त्या प्रत्येक ठिकाणी नियोक्त्याला त्या मोटार परिवहन कामगारांच्या उपयोगासाठी विहित करण्यात येतील तितक्या विश्रांतिकक्षांची अथवा अशा अन्य योग्य पर्यायी जागेची व्यवस्था करून त्यांची देखभाल ठेवावी लागेल. विश्रांतिकक्ष.

(२) पोटकलम (१) खाली ज्यांची व्यवस्था करावयाची त्या विश्रांतिकक्षांमध्ये किंवा पर्यायी जागेमध्ये पुरेसा प्रकाश व खेळती हवा असली पाहिजे आणि ते स्वच्छ व आरामप्रद स्थितीमध्ये ठेवण्यात आले पाहिजेत.

(३) या कलमाखाली ज्यांची व्यवस्था करावयाची त्या विश्रांतिकक्षांचे किंवा पर्यायी जागेचे बांधकाम, जागा, साजसामान आणि अन्य साधनसामग्री यांबाबत राज्य शासनाला मानके विहित करता येतील.

१०. (१) राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करून, त्याद्वारे मोटार परिवहन उपक्रमातील नियोक्त्याने त्या उपक्रमात कामाला असलेले चालक, वाहक, व मार्गतपासणी करणारा कर्मचारीवर्ग यांच्याकरता, पावसापासून किंवा थंडीपासून त्यांचा बचाव व्हावा यासाठी नियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील तितके व तशा प्रकारचे गणवेष, पावसाळी कोट किंवा अन्य सुखसोयी पुरवाव्यात असे आवश्यक करू शकेल. गणवेष.

(२) चालक, वाहक आणि मार्गतपासणी करणारा कर्मचारीवर्ग यांना पोटकलम (१) खाली पुरवलेल्या गणवेषांसाठी विहित करण्यात येईल अशा दराने नियोक्त्याने धुलाई भत्ता दिला पाहिजे :

परंतु, ज्या नियोक्त्याने गणवेष धुण्यासाठी स्वखर्चाने पुरेशी व्यवस्था केलेली असेल तो नियोक्ता असा भत्ता देण्यास दायी असणार नाही.

वैद्यकीय सुविधा.

११. मोटार परिवहन कामगारांकरिता राज्य शासन विहित करील अशा वैद्यकीय सुविधा विहित अशा कार्यकेंद्रांवर व विरामस्थानकांवर त्यांना त्या सहजपणे उपलब्ध होऊ शकतील अशाप्रकारे नियोक्त्याकडून उपलब्ध करण्यात येतील व त्या सुसज्ज ठेवण्यात येतील.

प्रथमोपचार सुविधा.

१२. (१) प्रत्येक परिवाहनामध्ये विहित साहित्यानिशी सुसज्ज अशी प्रथमोपचार पेटी कामाच्या सर्व वेळांमध्ये सहजपणे उपलब्ध होऊ शकेल अशा प्रकारे नियोक्त्याकडून पुरवण्यात येईल व ती सुस्थितीत ठेवण्यात येईल.

(२) प्रथमोपचार पेटीमध्ये विहित साहित्याव्यतिरिक्त दुसरे काहीही ठेवले जाणार नाही.

(३) प्रथमोपचार पेटी परिवाहनाच्या चालकाच्या किंवा वाहकाच्या ताब्यात ठेवली जाईल व त्यांना तिच्या वापराबाबतचे प्रशिक्षण देण्याची सोय करण्यात येईल.

## प्रकरण ५ वे

## कामधंद्याचे तास व मर्यादा

प्रौढ मोटार परिवहन कामगारांचे कामाचे तास.

१३. कोणत्याही प्रौढ मोटार परिवहन कामगाराला कोणत्याही दिवशी आठ तासांपेक्षा व कोणत्याही आठवड्यात अठ्ठेचाळीस तासांपेक्षा अधिक वेळ काम करावयास लावले जाणार नाही किंवा तशी मुभा दिली जाणार नाही :

परंतु, जेव्हा असा मोटार परिवहन कामगार, विहित प्राधिकरणाने विहित रीतीने अधिसूचित केले असतील अशा लांब पल्ल्यांच्या प्रवासमार्गांवर किंवा अशा उत्सवांच्या किंवा अन्य प्रसंगी कोणत्याही मोटार परिवहन सेवेच्या व्यवस्थेत गुंतलेला असेल तेव्हा, नियोक्ता अशा प्राधिकरणाची मान्यता घेऊन, अशा मोटार परिवहन कामगाराला कोणत्याही दिवशी आठ तासांहून अधिक किंवा कोणत्याही आठवड्यामध्ये अठ्ठेचाळीस तासांहून अधिक काम करावयास लावू शकेल किंवा तशी मुभा देऊ शकेल, मात्र कोणत्याही परिस्थितीत, प्रकरणपरत्वे, एका दिवशी दहा तासांहून अधिक आणि एका आठवड्यामध्ये चौपन्न तासां-पेक्षा अधिक काळ नाही :

परंतु आणखी असे की, मोटार परिवहन सेवा बंद पडली किंवा विस्कळित झाली अथवा वाहनांच्या रहदारीत अडथळा आला अथवा दैवी दुर्घटना घडली तर त्याबाबतीत, विहित असतील अशा शर्तींच्या व मर्यादांच्या अधीनतेने, नियोक्ता अशा कोणत्याही मोटार परिवहन कामगाराला कोणत्याही दिवशी आठ तासांपेक्षा अधिक किंवा कोणत्याही आठवड्यात अठ्ठेचाळीस तासांपेक्षा अधिक काम करावयास लावू शकेल किंवा तशी मुभा देऊ शकेल.

मोटार परिवहन कामगार म्हणून कामाला लावलेल्या किशोरवयीन व्यक्तींचे कामाचे तास.

१४. कोणत्याही मोटार परिवहन उपक्रमामध्ये मोटार परिवहन कामगार म्हणून कोणत्याही किशोरवयीन व्यक्तीला —

(क) दर दिवशी अर्ध्या तासाचे विश्रांतीचे मध्यंतर धरून सहा तासांपेक्षा जास्त काळ;

(ख) रात्री दहा ते सकाळी सहा या वेळांच्या दरम्यान,

कामावर ठेवले जाणार नाही किंवा काम करावयास लावले जाणार नाही.

दैनंदिन विश्रांतीची मध्यंतरे.

१५. (१) प्रौढ मोटार परिवहन कामगारांच्या संबंधात प्रत्येक दिवशीचे कामाचे तास अशा तऱ्हेने निश्चित करण्यात येतील की, जेणेकरून कोणताही कामाचा कालावधी पाच तासांहून अधिक होणार नाही आणि अशा कोणत्याही मोटार परिवहन कामगाराला निदान अर्धा तास तरी विश्रांतीचे मध्यंतर मिळाल्याखेरीज पाच तासांहून अधिक काळ काम करावे लागणार नाही :

परंतु, या पोटकलमाचे उपबंध विश्रांतीच्या मध्यंतराशी संबंधित आहेत तेथवर ते ज्या मोटार परिवहन कामगाराला त्या दिवशी सहा तासांहून अधिक काळ काम करावे लागणार नाही त्याला लागू होणार नाहीत.

(२) प्रत्येक दिवशीचे कामाचे तास अशा तऱ्हेने निश्चित केले जातील की, जेणेकरून प्रत्येक मोटार परिवहन कामगाराला कलम १३ च्या दुसऱ्या परंतुकामध्ये निर्देशित केलेल्या कोणत्याही बाबीखेरीज एरव्ही, कोणत्याही एका दिवसाची कामाची पाळी संपल्यापासून ते दुसऱ्या दिवसाची कामाची पाळी सुरू होईपर्यंत दरम्यान निदान सलग नऊ तासांचा तरी विश्रांतीचा कालावधी मिळेल.

कार्यकालविस्तार.

१६. (१) कलम १३ च्या दुसऱ्या परंतुकामध्ये निर्देशित केलेल्या कोणत्याही बाबीखेरीज एरव्ही, प्रौढ मोटार परिवहन कामगाराचे कामाचे तास अशा तऱ्हेने योजले जातील की, जेणेकरून कलम १५ खालील विश्रांतीचे मध्यंतर धरून ते कोणत्याही दिवशी बारा तासांपेक्षा अधिक होणार नाहीत.

(२) किशोरवयीन मोटार परिवहन कामगाराचे कामाचे तास अशा तऱ्हेने योजले जातील की, जेणेकरून कलम १४ खालील विश्रांतीचे मध्यंतर धरून ते कोणत्याही दिवशी नऊ तासांपेक्षा अधिक होणार नाहीत.

१७. या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या अन्य उपबंधांच्या अधीनतेने, मोटार परिवहन कामगाराच्या कामाचे तास कोणत्याही दिवशी दोनपेक्षा अधिक कालखंडांमध्ये विभागले जाणार नाहीत. विभागलेली कामाची पाळी.

१८. (१) मोटार परिवहन कामगारांना प्रत्येक दिवशी किती तास काम करावे लागेल हे स्पष्टपणे दर्शवणारी कामाच्या तासांबाबतची नोटीस, विहित असेल अशा नमुन्यात व अशा पद्धतीने नियोक्त्याकडून लावण्यात येईल व ती बिनचूक ठेवण्यात येईल. कामाच्या अवधीबाबतची नोटीस.

(२) या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या अन्य उपबंधांच्या अधीनतेने, अशा कोणत्याही मोटार परिवहन कामगाराला, याप्रमाणे कामाच्या तासांबाबत जी नोटीस लावली असेल तिच्यानुसार असेल त्याखेरीज अन्यथा काम करावयास लावले जाणार नाही किंवा तशी मुभा दिली जाणार नाही.

१९. (१) प्रत्येक सात दिवसांच्या कालावधीत एक विश्रांतीचा दिवस देण्याबाबत राज्य शासनाला **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील व तो दिवस सर्व मोटार परिवहन कामगारांना अनुज्ञेय असेल. साप्ताहिक विश्रांती.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मोटार वाहतूक सेवा विस्कळीत होऊ नये म्हणून नियोक्ता एखाद्या मोटार परिवहन कामगाराला सुटीचा दिवस नसलेल्या अशा कोणत्याही विश्रांतीच्या दिवशी काम करावयास लावू शकेल, तथापि ते अशा तऱ्हेने की, त्या मोटार परिवहन कामगाराला लागोपाठ दहा दिवसांहून अधिक काळ, मध्ये एका पूर्ण दिवसाची सुटी मिळाल्याशिवाय काम करावे लागता कामा नये.

(३) रजेपोटी खर्ची पडलेला कोणताही दिवस धरून ज्याचा कामधंद्याचा संपूर्ण कालावधी सहा दिवसांपेक्षा कमी असेल अशा कोणत्याही मोटार परिवहन कामगाराला पोटकलम (१) मध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

२०. या अधिनियमाच्या उपबंधांखाली कलम १९ च्या प्रवर्तनातून एखाद्या नियोक्त्याला सूट देण्यात आल्यामुळे जर, एखादा मोटार परिवहन कामगार त्या कलमाखाली त्याचा ज्या विश्रांतीच्या दिवसांवर हक्क आहे त्यांपैकी कोणताही दिवस मिळण्यापासून वंचित झाला तर, त्या मोटार परिवहन कामगाराला ज्या महिन्यात विश्रांति-दिवस अनुज्ञेय आहेत त्या महिन्यात किंवा त्या महिन्याच्या लगतनंतरच्या दोन महिन्यांत याप्रमाणे गमावलेल्या विश्रांति-दिवसांबद्दल भरपाई म्हणून तितकेच विश्रांति-दिवस त्याला अनुज्ञेय असतील. भरपाईचा विश्रांति-दिवस.

---

## प्रकरण ६ वे

### अल्पवयीन व्यक्तींना कामावर ठेवणे

२१. कोणत्याही बालकाला कोणत्याही मोटार परिवहन उपक्रमामध्ये कोणत्याही नात्याने काम करावयास लावले जाणार नाही किंवा तशी मुभा दिली जाणार नाही. बालकांना कामावर ठेवण्यास मनाई.

२२. कोणत्याही मोटार परिवहन उपक्रमात कोणत्याही किशोरवयीन व्यक्तीला—— मोटार परिवहन कामगार म्हणून कामाला लावलेल्या किशोरवयीन व्यक्तींनी टोकने बाळगणे.

(क) तिच्या संबंधात कलम २३ खाली देण्यात आलेले पात्रता-प्रमाणपत्र नियोक्त्याच्या ताब्यात असल्याखेरीज; आणि

(ख) अशा किशोरवयीन व्यक्तीने ती कामावर असताना अशा प्रमाणपत्राचा निर्देश करणारे टोकन स्वतःजवळ बाळगल्याखेरीज,

मोटार परिवहन कामगार म्हणून काम करावयास लावले जाणार नाही किंवा तशी मुभा दिली जाणार नाही.

२३. (१) कोणत्याही किशोरवयीन व्यक्तीने किंवा तिच्या आईने/वडिलांनी किंवा पालकाने अर्ज करून त्यासोबत, अशी व्यक्ती एखाद्या मोटार परिवहन उपक्रमामध्ये मोटार परिवहन कामगार म्हणून काम करण्यास पात्र असल्याचे प्रमाणित केले गेल्यास तिला त्या कामावर ठेवण्यात येईल अशा अर्थाचा नियोक्त्याने किंवा त्याच्या वतीने अन्य कोणत्याही व्यक्तीने स्वाक्षरित केलेला दस्तऐवज जोडलेला असेल तर, अथवा काम करू इच्छिणाऱ्या कोणत्याही किशोरवयीन व्यक्तीच्या संदर्भात नियोक्त्याने किंवा त्याच्या वतीने अन्य कोणत्याही व्यक्तीने अर्ज केला असेल तर, त्या अर्जावरून प्रमाणन शल्यचिकित्सक अशा व्यक्तीची तपासणी करील व मोटार परिवहन कामगार म्हणून काम करण्याची तिची पात्रता निश्चित करील. पात्रता-प्रमाणपत्र.

(२) या कलमाखाली देण्यात आलेले पात्रता-प्रमाणपत्र, ते ज्या दिनांकी दिले असेल त्या दिनांकापासून बारा महिनेपर्यंत विधिग्राह्य असेल, पण त्याचे नूतनीकरण करता येईल.

(३) या कलमाखालील प्रमाणपत्रासाठी द्यावी लागणारी कोणतीही फी नियोक्त्याकडन भरली जाईल आणि ती त्या किशोरवयीन व्यक्तीकडून, तिच्या आईकडून/वडिलांकडून किंवा पालकाकडून वसूल करता येण्यासारखी असणार नाही.

वैद्यकीय तपासणी आवश्यक करण्याची शक्ती.

२४. कोणत्याही मोटार परिवहन उपक्रमामध्ये पात्रता-प्रमाणपत्राशिवाय काम करणारा एखादा मोटार परिवहन कामगार हा किशोरवयीन आहे असे जर निरीक्षकाचे मत असेल तर, तो निरीक्षक अशा किशोरवयीन मोटार परिवहन कामगाराची प्रमाणन शल्यचिकित्सकाकडन तपासणी केली जावी असे फर्मावणारी नोटीस नियोक्त्यावर बजावू शकेल आणि जर नियोक्त्याने तसा निदेश दिला तर अशा किशोरवयीन मोटार परिवहन कामगारास, कलम २३ खाली त्याची अशा रीतीने तपासणी होऊन त्याला पात्रता-प्रमाणपत्र मिळेपर्यंत कोणत्याही मोटार परिवहन उपक्रमामध्ये कामावर ठेवले जाणार नाही किंवा काम करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

## प्रकरण ७ वे

## वेतन व रजा

मोटार परिवहन कामगारांना वेतन देण्याबाबत १९३६ चा अधिनियम ४ लागू असणे.

२५. 'वेतन प्रदान अधिनियम, १९३६' (१९३६ चा ४) हा त्या त्या काळी अंमलात असल्या-प्रमाणे, औद्योगिक आस्थापनेमध्ये प्रदेय असणाऱ्या वेतनांना जसा लागू होतो तसा, जणू काही उक्त अधिनियम त्याच्या कलम १-पोटकलम (५) खाली राज्य शासनाच्या अधिसूचनेद्वारे अशा मोटार परिवहन कामगारांना वेतन देण्याबाबत लागू केलेला असावा, आणि जणू काही मोटार परिवहन उपक्रम म्हणजे उक्त अधिनियमात अभिप्रेत असल्याप्रमाणे औद्योगिक आस्थापना असावी त्याप्रमाणे तो त्या मोटार परिवहन उपक्रमामध्ये कामाला लावलेल्या मोटार परिवहन कामागारांना लागू होईल.

अतिकालिक कामाबद्दल जादा वेतन.

२६. (१) जेव्हा एखादा प्रौढ मोटार परिवहन कामगार कलम १३ च्या पहिल्या परंतुकामध्ये निर्देशित केलेल्या कोणत्याही बाबतीत कोणत्याही दिवशी आठ तासांपेक्षा अधिक काम करील किंवा जेव्हा कलम १९ च्या पोटकलम (२) खाली कोणत्याही विश्रांतीच्या दिवशी त्याला काम करावे लागेल तेव्हा, तो अतिकालिक कामाबद्दल किंवा, प्रकरणपरत्वे, विश्रांतीच्या दिवशी केलेल्या कामाबद्दल त्याच्या सामान्य वेतनदराच्या दुप्पट दराने वेतन मिळण्यास हक्कदार राहील.

(२) जेव्हा एखादा मोटार परिवहन कामगार कलम १३ च्या दुसऱ्या परंतुकामध्ये निर्देशित केलेल्या बाबतीत कोणत्याही दिवशी आठ तासांपेक्षा अधिक काम करील, तेव्हा, तो त्या अतिकालिक कामाबद्दल विहित करण्यात येईल अशा दराने वेतन मिळण्यास हक्कदार राहील.

(३) जेव्हा एखादा किशोरवयीन मोटार परिवहन कामगाराला कलम १९-पोटकलम (१) खाली कोणत्याही विश्रांतीच्या दिवशी काम करावे लागेल तेव्हा, तो विश्रांतीच्या दिवशी केलेल्या कामाबद्दल त्याच्या सामान्य वेतनदराच्या दुप्पट दराने वेतन मिळण्यास हक्कदार राहील.

(४) या कलमाच्या प्रयोजनार्थ, "सामान्य वेतनदर" याचा मोटार परिवहन कामगाराच्या संबं-धातील अर्थ, मूळ वेतन अधिक महागाई भत्ता असा आहे.

वार्षिक सवेतन रजा.

२७. (१) विहित करण्यात येतील अशा सुटचांना बाध न येता, ज्याने एका कॅलेंडर वर्षामध्ये एखाद्या मोटार परिवहन उपक्रमामध्ये दोनशे चाळीस दिवस किंवा त्याहून अधिक काळ काम केलेले असेल त्या प्रत्येक मोटार परिवहन कामगाराला––

(क्) तो प्रौढ असेल तर त्याने मागील कॅलेंडर वर्षात केलेल्या दर वीस दिवसांमागे एक दिवस; आणि

(ख्) तो किशोरवयीन असेल तर, त्याने मागील कॅलेंडर वर्षात काम केलेल्या दर पंधरा दिवसांमागे एक दिवस,

या प्रमाणात परिगणना करून ठरवलेल्या दिवसांइतकी सवेतन रजा पुढील वर्षात अनुज्ञेय होईल.

(२) ज्या मोटार परिवहन कामगाराची नोकरी एक जानेवारी सोडून अन्य दिवशी सुरू होते त्याने जर उर्वरित कॅलेंडर वर्षाच्या एकूण दिवसांच्या दोन-तृतीयांश इतके दिवस काम केलेले असेल तर, पोटकलम (१) च्या खंड (क्) किंवा, प्रकरणपरत्वे, खंड (ख्) मध्ये ठरवून दिलेल्या दराने सवेतन रजा मिळण्यास तो हक्कदार राहील.

(३) जर एखाद्या मोटार परिवहन कामगाराला वर्ष चालू असताना नोकरीतून मुक्त केले किंवा बडतर्फ केले तर, ज्यामुळे पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे तो अर्जित रजेस हक्कदार होऊ शकतो त्या संपूर्ण कालावधीपर्यंत जरी त्याने काम केलेले नसले तरीसुद्धा, पोटकलम (१) मध्ये ठरवून दिलेल्या दराने तो सवेतन रजा मिळण्यास हक्कदार राहील.

(४) या कलमाखाली रजा परिगणित करताना, रजेचा अर्ध्या दिवसाइतका किंवा त्याहून अधिक अपूर्णांश म्हणजे एका संपूर्ण दिवसाची रजा धरली जाईल व अर्ध्या दिवसापेक्षा कमी अपूर्णांश वगळला जाईल.

(५) जर एखाद्या कॅलेंडर वर्षात एखाद्या मोटार परिवहन कामगाराने पोटकलम (१) किंवा, प्रकरण-परत्वे, पोटकलम (२) खाली त्याला अनुज्ञेय असणारी संपूर्ण रजा घेतलेली नसेल तर, त्याने न घेतलेली कोणतीही रजा त्याला पुढील कॅलेंडर वर्षात अनुज्ञेय असणाऱ्या रजेमध्ये मिळवली जाईल :

परंतु, एखाद्या वर्षातील एकूण जितक्या दिवसांची रजा पुढील वर्षात जमेस धरता येईल ती संख्या, प्रौढाच्या बाबतीत तीस दिवसांपेक्षा व किशोरवयीन व्यक्तीच्या चाळीस दिवसांपेक्षा अधिक होता कामा नये.

(६) या कलमामध्ये "कॅलेंडर वर्ष" याचा अर्थ, एक जानेवारी या दिवसापासून सुरू होणारे वर्ष असा आहे.

**स्पष्टीकरण**.––या कलमाच्या प्रयोजनार्थ, रजेमध्ये आठवडी सुटचा अथवा उत्सवांच्या किंवा तत्सम प्रसंगांबद्दलच्या सुटचा समाविष्ट असणार नाहीत––मग त्या सुटचा रजेच्या कालावधीमध्ये येवोत अथवा तिच्या सुरुवातीला किंवा शेवटी येवोत.

रजेच्या कालावधीमधील वेतन.

२८. (१) कलम २७ खाली मोटार परिवहन कामगाराला अनुज्ञेय असणाऱ्या रजेबद्दल त्याला, त्याच्या रजेच्या निकटपूर्वीच्या महिन्यामध्ये जितके दिवस त्याने काम केले असेल त्या दिवसांच्या त्याच्या एकूण पूर्णकालिक कमाईच्या दैनिक सरासरीइतक्या दराने पैसे दिले जातील––यामध्ये कोणतीही अतिकालिक कामाबद्दलची कमाई किंवा बोनस असल्यास तो वगळला आहे, पण महागाई भत्ता आणि ज्या दिवशी त्याने काम केले त्या दिवसाबद्दल नियोक्त्याने त्याला सवलतीच्या भावाने केलेल्या अन्नधान्याच्या पुरवठ्याद्वारा उपार्जित होणारा काही फायदा असल्यास त्याचे रोख सममूल्य समाविष्ट आहे.

(२) ज्या मोटार परिवहन कामगाराला कलम २७ खाली चार दिवसांपेक्षा कमी नाही इतकी रजा देण्यात आलेली असेल त्याने याबाबत नियोक्त्याकडे केलेल्या अर्जावरून, त्याला त्याच्या रजेच्या कालावधीबद्दल त्याला प्रदेय असलेल्या वेतनाइतकी अदमासे असलेली रक्कम त्याची रजा सुरू होण्यापूर्वी आगाऊ देण्यात येईल, आणि अशा तऱ्हेने दिलेली कोणतीही रक्कम, पूर्वोक्त रजेच्या कालावधीबद्दल त्याला प्रदेय असणाऱ्या वेतनाशी समायोजित केली जाईल.

(३) जर मोटार परिवहन कामगाराला कलम २७-पोटकलम (३) खाली तो ज्या रजेस हक्कदार आहे ती रजा देण्यात आली नाही तर, त्याला त्याच्या बदल्यात पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी वेतन देण्यात येईल.

---

## प्रकरण ८ वे

## दंड व प्रक्रिया

अटकाव.

२९. (१) जो कोणी निरीक्षकाला तो या अधिनियमाखालील त्याची कर्तव्ये पार पाडीत असताना अटकाव करील किंवा कोणत्याही मोटार परिवहन उपक्रमाच्या संबंधात या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली प्राधिकृत केलेले कोणतेही निरीक्षण, तपासणी किंवा चौकशी करण्याकरिता त्या निरीक्षकाला कोणतीही वाजवी सुविधा देण्याचे नाकारील किंवा त्याकामी बुद्धिपुरस्सर उपेक्षा करील तो, तीन महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

(२) जो कोणी या अधिनियमानुसार ठेवलेली कोणतीही नोंदवही किंवा अन्य दस्तऐवज, निरीक्षकाने मागणी केली असता हजर करण्यास बुद्धिपुरस्सर नकार देईल अथवा निरीक्षक या अधिनियमाखालील आपल्या कर्तव्यांच्या अनुरोधाने कृती करीत असताना कोणत्याही व्यक्तीला त्याच्यापुढे हजर होण्यास किंवा त्याच्याकडून तपासणी केली जाण्यास प्रतिबंध करील किंवा प्रतिबंध करण्याचा प्रयत्न करील किंवा ज्यामुळे तसा प्रतिबंध होणे संभवनीय आहे असे त्याला सकारण वाटते अशी कोणतीही गोष्ट करील तो, तीन महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

खोटचा पात्रता-प्रमाणपत्राचा वापर.

३०. जो कोणी, कलम २३ खाली दुसऱ्या व्यक्तीला देण्यात आलेल्या प्रमाणपत्राचा त्या कलमाखाली स्वतःला मिळालेले पात्रता–प्रमाणपत्र म्हणून समजूनसवरून वापर करील किंवा वापर करण्याचा प्रयत्न करील अथवा आपणास पात्रता-प्रमाणपत्र मिळालेले असता समजूनसवरून अन्य व्यक्तीला ते वापरू देईल किंवा वापरण्याचा प्रयत्न करू देईल तो एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

मोटार परिवहन कामगारांना कामावर ठेवण्याच्या संबंधातील उपबंधांचे व्यतिक्रमण.

३१. या अधिनियमाचा किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांचा जो उपबंध मोटार परिवहन उपक्रमामध्ये माणसे कामावर ठेवण्यास मनाई करणारा, त्यावर निबंध घालणारा किंवा त्याचे विनियमन करणारा असेल त्याचे या अधिनियमानुसार किंवा त्याखाली अनुज्ञेय असेल त्याहून अन्य प्रकारे जो कोणी व्यतिक्रमण करील तो, तीन महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस आणि असे व्यतिक्रमण चालू राहिल्यास त्याबाबतीत अशा पहिल्या व्यतिक्रमणाबद्दलच्या दोषसिद्धीनंतर ज्या ज्या दिवशी ते व्यतिक्रमण चालू राहील त्या प्रत्येक दिवसामागे पंचाहत्तर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या अधिक द्रव्यदंडास पात्र असेल.

अन्य गुन्हे.

३२. जर कोणी या अधिनियमाखाली निदेश देण्याची शक्ती बहाल करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीने किंवा प्राधिकरणाने विधितः दिलेल्या अशा निदेशाची बुद्धिपुरस्सर अवज्ञा केली अथवा या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांच्या उपबंधांचे व्यतिक्रमण केले आणि त्याबद्दल या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली इतरत्र अन्य कोणतीही शिक्षा उपबंधित केलेली नसेल तर, तो तीन महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

पूर्वीच्या दोषसिद्धीनंतर वाढीव दंड.

३३. या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही गुन्ह्याबद्दल दोषी ठरवलेल्या एखाद्या व्यक्तीने पुन्हा त्याच उपबंधाचे व्यतिक्रमण अंतर्भूत असलेला गुन्हा केला तर, नंतरच्या दोषसिद्धीअंती ती व्यक्ती सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल :

परंतु, या कलमाच्या प्रयोजनार्थ, ज्याबद्दल शिक्षा दिली जात असेल तो गुन्हा घडण्याच्या मागील दोन वर्षांहून अधिक काळापूर्वी झालेल्या कोणत्याही दोषसिद्धीची दखल घेतली जाणार नाही.

कंपन्यांनी केलेले गुन्हे.

३४. या अधिनियमाखालील गुन्हा करणारी व्यक्ती ही कंपनी असल्यास, कंपनी व तसेच, गुन्हा घडतेवेळी कंपनीच्या कामकाज-चालनाबद्दल कंपनीची प्रभारी असलेली व त्यासाठी कंपनीला जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती त्या गुन्ह्याबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तिच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व शिक्षा मिळण्यास ती पात्र असेल :

परंतु, असा गुन्हा आपल्या नकळत घडला किंवा तो घडू नये म्हणून आपण सर्वप्रकारे वाजवी तत्परता दाखवली होती असे जर अशा कोणत्याही व्यक्तीने शाबीत केले तर, या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ती व्यक्ती कोणत्याही शिक्षेस पात्र होणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा या अधिनियमाखालील गुन्हा एखाद्या कंपनीने केलेला असेल, आणि कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, व्यवस्थापन एजंट किंवा अन्य कोणताही अधिकारी याच्या संमतीने किंवा मूकानुमतीने तो गुन्हा घडलेला आहे किंवा गुन्हा घडण्याचा कारणसंबंध त्याच्याकडून झालेल्या हलगर्जीपणाशी जोडता येण्यासारखा आहे असे शाबीत करण्यात आले तर, असा संचालक, व्यवस्थापक, व्यवस्थापन एजंट किंवा असा अन्य अधिकारी हादेखील त्या गुन्ह्याबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल आणि त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तदनुसार शिक्षा मिळण्यास तो पात्र राहील.

**स्पष्टीकरण** :—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगम-निकाय असा आहे व त्यात पेढी किंवा अन्य व्यक्ति-संघाचा समावेश होतो; आणि

(ख) "संचालक" याचा पेढीच्या संबंधातील अर्थ, पेढीतील भागीदार असा आहे.

गुन्ह्यांची दखल घेणे.

३५. कोणतेही न्यायालय या अधिनियमाखालील कोणत्याही गुन्ह्याबाबत मुख्य निरीक्षकाकडून किंवा त्याच्या लेखी पूर्वपरवानगीने तक्रार करण्यात आल्याखेरीज त्याची दखल घेणार नाही आणि इलाखा शहर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग दंडाधिकारी यांच्या न्यायालयाहून कमी दर्जा असलेले कोणतेही न्यायालय या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही गुन्ह्याची संपरीक्षा करणार नाही.

खटल्यांची मुदत.

३६. या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्याबाबत, अभिकथित गुन्हा घडल्याचे निरीक्षकाला कळल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत त्यासंबंधी तक्रार केलेली आहे असे झाल्याशिवाय कोणतेही न्यायालय त्याची दखल घेणार नाही :

परंतु, निरीक्षकाने दिलेल्या लेखी आदेशाची अवज्ञा करण्याचा गुन्हा घडलेला असेल तर, तो गुन्हा ज्या दिनांकास घडला असल्याचे अभिकथित करण्यात आले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत त्याबाबतची तक्रार करता येईल.

## प्रकरण ९ वे

## संकीर्ण

**या अधिनियमाशी विसंगत असलेले कायदे व करार यांची परिणामकता.**

३७. (१) या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत अशी कोणतीही गोष्ट अन्य कोणत्याही कायद्यात अथवा, कोणताही निवाडा, करार किंवा सेवा-संविदा––मग ती या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी केलेली असोत नंतर केलेली असोत––यांच्या अटींमध्ये अंतर्भूत असली तरी, ते उपबंध परिणामक होतील :

परंतु, एखाद्या बाबीसंबंधी एखाद्या मोटार परिवहन कामगाराला या अधिनियमाखाली ज्या लाभांवर हक्क प्राप्त झाला असता त्यांहून जे त्याला अधिक अनुकूल आहेत अशा लाभांना तो कामगार असा कोणताही निवाडा, करार किंवा सेवा-संविदा यांखाली किंवा अन्यथा हक्कदार ठरत असेल तर, इतर बाबतीत त्याला या अधिनियमाखाली लाभ मिळत असले तरी, तेवढ्या बाबीपुरते त्याला अधिक अनुकूल लाभ मिळण्याचे चालू राहील.

(२) कोणताही मोटार परिवहन कामगार एखाद्या बाबतीत या अधिनियमाखाली जे अधिकार किंवा सवलती मिळण्यास हक्कदार होऊ शकेल त्यांपेक्षा जे त्याला अधिक अनुकूल आहेत असे अधिकार किंवा सवलती आपणांस देण्याविषयी नियोक्त्याशी करार करण्यास त्या कामगाराला या अधिनियमातील कोणतीही गोष्ट प्रतिबंधक आहे असा तिचा अर्थ लावला जाणार नाही.

**सूट.**

३८. (१) या अधिनियमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट––

(एक) रुग्ण किंवा जखमी व्यक्तींना नेण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या;

(दोन) भारताचे संरक्षण किंवा एखाद्या राज्याचे संरक्षण किंवा सार्वजनिक सुव्यवस्था राखणे यांच्याशी निगडित असलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी वापरल्या जाणाऱ्या,

कोणत्याही परिवाहनाला अथवा त्याच्या संबंधात लागू होणार नाही.

(२) पोटकलम (१) च्या उपबंधांना बाध न येता, राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असे निदेशित करू शकेल की, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा काही शर्ती व निर्बंध असल्यास त्यांच्या अधीनतेने, या अधिनियमाचे उपबंध किंवा त्याखाली केलेले नियम हे,––

(एक) राज्य शासनाच्या मते जे कोणत्याही मोटार परिवहन उपक्रमामध्ये पर्यवेक्षकीय किंवा व्यवस्थापकीय पद धारण करतात अशा कोणत्याही मोटार परिवहन कामगारांना;

(दोन) कोणत्याही अंशकालिक मोटार परिवहन कामगाराला ; व

(तीन) नियोक्त्यांच्या एखाद्या वर्गाला

लागू होणार नाहीत :

परंतु, या पोटकलमाखाली कोणताही आदेश काढण्यापूर्वी राज्य शासन त्याची एक प्रत केंद्र शासनाकडे पाठवील.

**निदेश देण्याची शक्ती.**

३९. केंद्र शासन या अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधांची कोणत्याही राज्यामध्ये अंमलबजावणी करण्याबाबत त्या राज्याच्या शासनाला निदेश देऊ शकेल.

**नियम करण्याची शक्ती.**

४०. (१) राज्य शासनाला या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी पूर्वप्रकाशनाच्या शर्तीच्या अधीनतेने नियम करता येतील :

परंतु, 'सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम १८९७' (१८९७ चा १०)-कलम २३–खंड (३) खाली विनिर्दिष्ट करावयाचा दिनांक हा प्रस्तावित नियमांचा मसुदा ज्या दिनांकास प्रकाशित होणार त्या दिनांकापासून सहा आठवड्यांपेक्षा अलिकडचा असणार नाही.

(२) विशेषतः, आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, अशा कोणत्याही नियमांद्वारे पुढील गोष्टींबाबत उपबंध करता येतील––

(क्) मोटार परिवहन उपक्रमाच्या नोंदणीसाठी कोणत्या नमुन्यात अर्ज करावयाचा, असा अर्ज किती कालावधीत व कोणत्या प्राधिकरणाकडे करता येईल ;

(ख्) मोटार परिवहन उपक्रमाबाबतचे नोंदणी प्रमाणपत्र देणे व अशा नोंदणीसाठी द्यावी लागणारी फी ;

(ग्) मुख्य निरीक्षक व निरीक्षक यांच्या बाबतीत आवश्यक असलेल्या अर्हता ;

(घ्) निरीक्षकांना कोणत्या शक्ती वापरता येतील व अशा शक्ती कोणत्या रीतीने वापरता येतील ;

(ङ) प्रमाणन शल्यचिकित्सकांना कोणत्या प्रकारे वैद्यकीय देखरेख ठेवता येईल;

(च्) मुख्य निरीक्षक किंवा निरीक्षक यांच्या कोणत्याही आदेशाविरुद्ध करावयाची अपिले आणि अशी अपीले कोणत्या नमुन्यात, किती मुदतीत आणि कोणत्या प्राधिकरणाकडे दाखल करता येतील;

(छ) या अधिनियमानुसार ज्या सुविधांची तरतूद करून त्या सुसज्ज राखणे अपेक्षित आहे त्यांची किती मुदतीत याप्रमाणे तरतूद करता येईल ;

(ज्) मोटार परिवहन कामगारांना कोणत्या वैद्यकीय सुविधा पुरवल्या जाव्यात ;

(झ्) प्रथमोपचार पेट्यांमध्ये कोणत्या प्रकारची साधनसामग्री पुरवली जावी ;

(ञ्) विहित प्राधिकरणाला लांब पल्ल्यांचे प्रवासमार्ग, उत्सवाचे किंवा अन्य प्रसंग कोणत्या रीतीने अधिसूचित करावे लागतील ;

(ट्) कलम १३ च्या दुसऱ्या परंतुकामध्ये निर्देशित केलेल्या कोणत्याही बाबतीत कोणत्या शर्तींच्या व मर्यादांच्या अधीनतेने कोणत्याही मोटार परिवहन कामगाराला एखाद्या दिवशी आठ तासांपेक्षा अधिक किंवा एखाद्या आठवडयात अठ्ठेचाळीस तासांपेक्षा अधिक वेळ काम करावयास लावता येईल किंवा तशी मुभा देता येईल;

(ठ्) कामाच्या अवधीबाबतच्या नोटिसा कोणत्या नमुन्यात व कशा रीतीने लावाव्या व ठेवाव्या लागतील;

(ड्) कलम १३ च्या दुसऱ्या परंतुकामध्ये निर्देशित केलेल्या कोणत्याही बाबतीत मोटार परिवहन कामगाराने केलेल्या अतिकालिक कामाबद्दल द्याव्या लागणाऱ्या जादा वेतनाचे दर;

(ढ्) नियोक्त्यांनी राखावयास हव्या त्या नोंदवह्या आणि राज्य शासनाच्या मते या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ आवश्यक असतील ती प्रतिवेदने--मग ती प्रासंगिक असोत वा नियतकालिक असोत; आणि

(ण्) विहित करावयाची किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

---

## THE MOTOR TRANSPORT WORKERS ACT, 1961

### मोटार परिवहन कामगार अधिनियम, १९६१

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| act of God | दैवी दुर्घटना | [S. 13-2nd proviso] |
| certificate of fitness | पात्रता-प्रमाणपत्र | [S. 23-m.n.] |
| compensatory day of rest | भरपाईचा विश्रांति-दिवस | [S. 20-m.n.] |
| halting stations | विराम स्थानके | [S. 11] |
| hours of work | कामाचे तास | [S. 2(f)] |
| inspecting staff | निरीक्षण करणारा कर्मचारीवर्ग | [Chapter III-heading] |
| line checking staff | मार्गतपासणी करणारा कर्मचारीवर्ग | [S. 10] |
| motor transport undertaking | मोटार परिवहन उपक्रम | [S. 2(g)] |
| motor transport worker | मोटार परिवहन कामगार | [S. 2(h)] |
| operating centres | कार्यकेंद्रे | [S. 11] |
| period of mere attendance | निव्वळ हजेरीचा अवधी | [S. 2(f)-expl.(3)] |
| reply to possible calls | वेळीप्रसंगी पडेल ती गरज निभावणे | [S. 2(f)-expl.(3)] |
| rest rooms | विश्रांतिकक्ष | [S. 9-m.n.] |
| running time | धावण्याचा वेळ | [S. 2(f)-expl. (1)] |
| service sheets | सेवापत्रके | [S. 2(f)-expl. (2)(i)] |
| sign off | काम संपवून जाण्याची सही करणे | [S. 2(f)-expl. (2)(iii)] |
| sign on | कामावर हजर झाल्याची सही करणे | [S. 2(f)-expl. (2)(iii)] |
| spells | कालखंड | [S. 17] |
| split duty | विभागलेली कामाची पाळी | [S. 17-m.n.] |
| spread over | कार्यकालविस्तार | [S. 2(k)] |
| subsidiary work | दुय्यम काम | [S. 2(f)-expl.(2)] |
| time-keeper | समयलेखक | [S. 2(h)] |
| transport vehicle | परिवाहन | [S. 2 (f)(i)] |
| weekly rest | साप्ताहिक विश्रांती | [S. 19-m.n.] |

---

## मोटार परिवहन कामगार अधिनियम, १९६१

### THE MOTOR TRANSPORT WORKERS ACT, 1961

### मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| काम संपवून जाण्याची सही करणे | sign off | [S.2(f)-expl.(2)(iii)] |
| कामाचे तास | hours of work | [S. 2(f)] |
| कामावर हजर झाल्याची सही करणे | sign on | [S.2(f)-expl.(2)(iii)] |
| कार्यकालविस्तार | spread over | [S. 2(k)] |
| कार्यकेंद्रे | operating centres | [S. 11] |
| कालखंड | spells | [S. 17] |
| दुय्यम काम | subsidiary work | [S.2(f)-expl. (2)] |
| दैवी दुर्घटना | act of God | [S. 13-2nd proviso] |
| धावण्याचा वेळ | running time | [S. 2(f)-expl. (1)] |
| निरीक्षण करणारा कर्मचारीवर्ग | inspecting staff | [Chapter III-heading] |
| निव्वळ हजेरीचा अवधी | period of mere attendance | [S. 2(f)-expl. (3)] |
| परिवाहन | transport vehicle | [S.2(f)(i)] |
| पात्रता-प्रमाणपत्र | certificate of fitness | [S. 23-m.n.] |
| भरपाईचा विश्रांति-दिवस | compensatory day of rest | [S. 20-m.n.] |
| मार्गतपासणी करणारा कर्मचारीवर्ग | line checking staff | [S. 10] |
| मोटार परिवहन उपक्रम | motor transport undertaking | [S. 2(g)] |
| मोटार परिवहन कामगार | motor transport worker | [S. 2(h)] |
| विभागलेली कामाची पाळी | split duty | [S.17-m.n.] |
| विराम स्थानके | halting stations | [S.11] |
| विश्रांतिकक्ष | rest rooms | [S. 9-m.n.] |
| वेळीप्रसंगी पडेल ती गरज निभावणे | reply to possible calls | [S. 2(f)-expl.(3)] |
| समयलेखक | time-keeper | [S.2(h)] |
| साप्ताहिक विश्रांती | weekly rest | [S.19-m.n.] |
| सेवापत्रके | service sheets | [S.2(f)-expl.(2)(i)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई